BHARTIYA VIDYA BHAVAN'S
SARDAR PATEL COLLEGE OF ENGINEERING
A Government Aided Autonomous Institute Affiliated
to University of Mumbai
Munshi Nagar, Andheri (West), Mumbai 400 058.

Three Days Workshop
on
"Enhancement of Work Productivity" for Non-teaching Staff

On 14th to 16th November, 2019 at Keshav Srushti, Esselworld Road, Uttan Village, Bhayander (West), Thane 401 106, Maharashtra

Under TEQIP-III

टेक्वीप- III प्रकल्पाअंतर्गत सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पुढाकाराने प्रशिक्षण व आस्थापना विभागाने दिनांक १४ ते १६ नोव्हेंबर २०१९ हया कालावधीत **"Enhancement of Work Productivity"** " कर्मचारी कार्यक्षमता संवर्धन व वृध्दी" हया विषयावर भाईदंर (पश्चिम) येथील केशवसृष्टी सारख्या निसर्गरम्य परिसरात शिक्षकेत्तर कर्मच्या-यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयातील १७ प्रशिक्षणार्थी , तंत्रिशिक्षण संचालनालय (म.रा) कार्यालयातील १७ प्रशिक्षणार्थी तसेच शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय- कराड येथील ४ प्रशिक्षणार्थी असे एकूण ३८ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सर्व प्रशिक्षणार्थ्यांचे केशवसृष्टीत आगमन झाल्यानंतर सकाळच्या न्याहरी (Breakfast) नंतर कार्यशाळेच्या उदघाटन समारंभास सुरुवात करण्यात आली. हया उदघाटन कार्यक्रमासाठी सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उप प्राचार्य तथा स्थापत्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एम. एम.मुरुडी, यांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. निलेश रा. रायकर, विदयुत विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अनुपा ग. सबनीस तसेच सी.सी. ई. (Centre for Continuing Education)च्या प्रमुख प्रा. विदयुलता पी. जोशी हजर होते. सर्वप्रथम श्री. लुईस पी. डायस यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सर्व मान्यवरांची ओळख करुन दिली व त्यांना पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. तदनंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.





प्रा. व्हि.पी. जोशी यांनी सर्वप्रथम आपले मनोगत व्यक्त करताना एक ॲक्टीव्हिटी घेतली ज्यामध्ये आपण या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींनी आपल्याला सहकार्य केले त्या सर्वांचे आपण आभार मानायला तसेच सर्वाना धन्यवाद दयायला हवेत या विषयी माहिती दिली.




यांत्रिकी विभगाचे विभाग प्रमुख डॉ. निलेश रा. रायकर, यांनी हया कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व हया कार्यशाळेव्दारे आपली कामे करण्यासाठी कार्यक्षमता निश्चितच वाढेल अशी ग्वाही दिली.

विदयुत विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. अनुपा ग. सबनीस यांनी अश्या कार्यशाळेमुळे आपण आपल्या आरोग्याची काळजी तर घेऊ त्याबरोबर आपल्या दैनदिन व्यवहारात, कामकाजात सकारात्मक विचार करु याचे महत्व पटवून दिले.




सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उप प्राचार्य तथा स्थापत्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एम. एम. मुरुडी यांनी आता पर्यंत झालेल्या कार्यशाळेचा प्रशिक्षणार्थ्यांना निश्चितच फायदा झाला आहे व पुढेही होत राहिल असे आश्वासन दिले. उदघाटन सोहळयानंतर कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात कार्यशाळेचे को-ऑडीनेटर डॉ. राहुल दहातोंडे यांनी "ओळख अंतरगांची" या विषयावर मार्गदर्शन करताना प्रात्याक्षिके करुन घेतले यामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थिनी आपल्या जोडीदाराबरोबर चर्चा करुन त्यांचे स्ट्रेंथ व विकनेस तसेच हया कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यामागचा उददेश काय होता ? याविषयी कथन करण्यास सांगितले.




दुपारच्या सत्रात श्री. अनिल ज. पाटील " ताणतणाव मुक्त आयुष्याची गुरुकिल्ली " हयाविषयी मार्गदर्शन केले. हयामध्ये त्यांनी निरनिराळया उदाहरणाव्दारे व प्रात्याक्षिकाव्दारे प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद साधला.




दुस-या दिवसाची सुरुवात सकाळी योगा सत्राने सुरु झाली. श्री. अनिल ज. पाटील यांनी योगाची माहिती दिली व आपल्या जिवनात योगाचे महत्व पटवून योगाचे प्रकार करुन घेतले.




डॉ. राहुल दहातोंडे सरांनी आपल्या सत्रात " दैनदिन कार्यात परिणामकतेसाठी संघभावनेचा विकास" या विषयावर मार्गदशन करताना प्रात्याक्षिक करुन घेतले व त्या प्रात्याक्षिकावर संपूर्ण मार्गदर्शन करुन एखादे काम करताना विजयापेक्षा सांघिक भावना किती महत्वाची आहे हे सर्वाना पटवून दिले.






दुपारच्या सत्रात श्री. सौरी दास यांनी "संस्थेप्रती जबाबदारीची भावना व त्याचे निर्वहन" या विषयावर मागदर्शन केले. मार्गदशनाच्या शेवटी त्यांनी प्रत्येकांना एका प्लेन पेपर देऊन इथे हजर असलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दल आपणांस काय वाटते हे सर्वाकडून लिहून घेतले.




तिस-या दिवसाची सुरुवातही योगा वर्गाने करण्यात आली हयासाठी देखील श्री. अनिल ज. पाटील सरांचे मार्गदर्शन लाभले.




दुपारी श्री. अनिल ज. पाटिल यांनी टाईम मॅनेजमेंट व ५ S हया विषयी प्रबोधन केले.




भोजनानंतर कार्यशाळेची सांगता करताना श्री अनिल ज. पाटिल यांनी तीनही दिवसाच्या कार्यक्रमाविषयी आपला अनुभव कथन केला. नंतर डॉ. राहुल तु. दहातोंडे यांनी देखिल आपल्याला आपला अनुभव सांगितला. त्यानंतर काही निवडक प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या कार्यक्रमाविषयी अभिप्राय (Feedback) दिला. त्यावर आपले मत मांडले. या समारोह समारंभात डॉ. एस. पी. यावलकर, प्रभारी संचालक, या संमारभांत प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातुन राबविण्यात आलेला हा उपक्रम शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी फारच स्तुत्य असून यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या कर्मचा-यांना सामावून घेतले त्याबद्दल सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे धन्यवाद मानले तसेच या कार्यक्रमाचे समन्वयक श्री. लुईस पी. डायस व श्रीमती समिधा स. वालावलकर यांचे कौतुक केले.





सरते शेवटी सर्व प्रशिक्षणार्थीला प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले व कार्यशाळेची सांगता करण्यात आली. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून श्री. लुईस पी. डायस व श्रीमती समिधा स. वालावलकर यांनी कार्यशाळेचेआयोजक म्हणून काम पाहीले.